# अहवाल

दिनांक 12 मार्च 2021 ला कृषी उत्पन्न वाढीमध्ये मशरूम उद्योग व फळबाग उद्योगाचे योगदान या विषयावर व्यवसाय प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला पायलट मशरूम उद्योग बाम्हणी चे संचालक व मार्गदर्शक मान. अनंत ईखार व मान. शुभांगी ईखार यांनी 46 विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन मार्गदर्शन केले.

मा. अनंत ईखार यांनी सांगितले की मशरूम (अळंबी) हे एक उच्च प्रथिने असलेले अन्न असून, ते पाचक आहे. आहारात समतोल राखण्यासाठी व शरीर निरोगी ठेवण्यासाठी आवश्यक असलेली मूलद्रव्ये मशरूममध्ये असतात. मशरूममध्ये ब-१, ब-२ व क जीवनसत्त्वे, पालाश, कॅल्शियम, सोडियम, स्फुरद, लोह आदी भरपूर प्रमाणात आहेत. मशरूममध्ये शरीर वाढीसाठी आवश्यक अमिनो आम्ले असल्याने लहान मुलांना फारच उपयोगी अन्न म्हणून सिद्ध झाले आहे. मशरूम मध्ये पिष्टमय पदार्थ व शर्करा अत्यल्प प्रमाणात असल्याने उच्च रक्तदाब असणाऱ्यांना गुणकारी, आरोग्यवर्धक आहे. कर्करोग, हृदयरोग, अर्धांगवायू, संधीवात, मधुमेह आदी रुग्णांसाठीही मशरूम खाणे चांगले असते.बाजारात मागणी ही चांगली आहे.शेतीला जोड व्यवसाय उत्तम असून शेतकऱ्यांनी मशरूम उद्योग करावा .

ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनी पर्यायी व्यवसाय म्हणून निरनिराळ्या फळे व भाजीपाल्यावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांऐवजी विविध फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग उभारले पाहिजेत. उदा. केळी, आंबा, डाळिंब, द्राक्षे, आवळा, बोर, संत्रा इत्यादी फळांच्या उत्पादनात देशात महाराष्ट्र राज्य आघाडीवर असल्याने त्यांच्यावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारण्यासाठी येथे फार मोठा वाव व संधी उपलब्ध आहे. याकडे आताच सर्व सामर्थ्यासह वळणे, हे कृषि व फळबाग क्रांती खऱ्याअर्थाने यशस्वी होण्यासाठी गरजेचे आहे.

(H. P. Singade)

Scanned by CamScanner

## Dr. L. D. Balkhande College of Arts and Commerce Pauni, Dist.Bhandara

### Notice

All the students of the college are informed that a Career Guidance Workshop is organised on 'Mashroom Farming and Marketing' under the Career Guidance Cell on 12 March 2021 at 09:30 AM to 11:30 AM. Hon. Anant Ikhar, Director of Pilot Mashroom Farm Bamhani is the guest. So, it is mandatory for all students to attend the program.

Date: 10-03-2021

Place: Pauni

(N.P. Singade)

Scanned by CamScanner

Workshop

"Mashroom Farming And Marketing"




- मार्गदर्शन करताना श्री. अनंत ईरवार -

Scanned by CamScanner

रविवारीय
देशोन्नती
नागपूर रविवार, दि.१४ मार्च २०२१ पृष्ठे ८+६ =१४ मूल्य ₹:६

भंडारा Live देशोन्नती
■ रविवार, दि.१४ मार्च २०२१ ■ https://www.deshonnati.com

# डॉ.एल.डी.बलखंडे कॉलेज पवनी येथे मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यशाळा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**पवनी** ■ डॉ.एल.डी.बलखंडे कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स,पवनी येथे करियर गायडन्स सेल व उद्योजकता विभाग यांच्या वतीने कृषी उत्पन्न वाढीमध्ये मशरूम उद्योगाचे योगदान या विषयावर मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यशाळेला अध्यक्ष प्राचार्य डॉ.अनिल कोसमकर, मार्गदर्शक अनंत ईखार हे होते. उपस्थितीमध्ये प्रा.संजय नंदागवळी, प्रा.एन.पी.सिंगाडे हे प्रामुख्याने उपस्थित होते.



अनंत ईखार यांनी सांगितले की, आज सरकारी नोकरीची कमतरता असल्यामुळे विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसाय निवडावा. डॉ.अनिल कोसमकर यांनी विद्यार्थ्यांनी आत्मनिर्भर बनण्याचा प्रयत्न करावा असे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.एन.पी.सिंगाडे यांनी तर संचालन प्रा.विलास मेश्राम यांनी केले. आभार विशाल नंदपूरे यांनी मानले यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, विद्यार्थी उपस्थित होते .(ता.प्र.)

Scanned by CamScanner